७८५

वैद्यकिय कारणास्तव रजा मंजूरी

राजपत्रीत व अराजपत्रीत शासकीय कर्मचा-यांना विहीत नमुन्यांत प्रमाणपत्र देणे.

CR1986012701

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
परिपत्रक क्रमांक -एमआयएस १०८५/५२३१/का-९
मंत्रालय-मुंबई- ३२.
दिनांक/- २१/१/१९८६.

## प रि प त्र क.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, राजपत्रीत व अराजपत्रीत शासकीय कर्मचा-यांना वैद्यकिय कारणास्तव कोणत्याही प्रकारची रजा आवश्यक असेल व त्यासाठी सक्षम प्राधिका-यानि त्याला प्राधिकृत वैद्यकिय अधिका-याचे प्रमाणपत्र सादर करण्यांत सांगितले असेल तर असे प्रमाणपत्र विहीत नमुन्यांत दिले जात नाही. त्यामुळे अशा प्रकारची रजा मंजूर करताना अडचणी निर्माण होतात. म्हणून सर्व शासकीय रुग्णालयांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी आपल्या रुग्णालयातील सर्व संबंधित वैद्यकिय अधिका-यांना अशा सूचना द्याव्यात की, त्यांनी राजपत्रीत व अराजपत्रीत शासकीय कर्मचा-यांना वैद्यकिय कारणासाठी रजेची शिफारस करणारी प्रमाणपत्रे म.ना.से. [रजा] नियम १९८१ च्या नियम क्रमांक अनुक्रमे ४० व ४१ नुसार विहीत केलेल्या अनुक्रमे नमुना ३ व ४ मध्येच देण्यांत यावीत. प्रमाणपत्र नमुना ३ व ४ सोबत जोडण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-[प्रभाकर भारे]
कार्यासन अधिकारी.

प्रति,
सेटलमेंट कमीशनर व डायरेक्टर ऑफ लॅन्ड रेकॉर्डस, पुणे.

-x-x-x-x-x

क्रमांक लेखा ३१५/सी.आर१२८३/अ३/८६
पुणे, दिनांक:- १८/२/१९८६.

प्रतिलिपी/- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व/ अधिक्षक भूमि अभिलेख सर्व/ विशेष अधिक्षक भूमि अभिलेख सर्व/ एकत्रीकरण अधिकारी सर्व यांना माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी सस्नेह अग्रेषित.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख[म. राज्य]पुणे. यांचेकरिता.

प्रत /- कार्यासन अधिकारी ई १ ते ५/ अ १, २, निवड धारिका अभिलेखापाल.

नालबंद/१८२८६

३२

नमुना ३
[नियम ४० पहा]

रजेची किंवा रजावाढीची किंवा रजा परिवर्तित करण्याची शिफारस करण्यात आलेल्या राजपत्रित अधिका-यांकरिता वैदयकिय प्रमाणपत्र.

............................यांच्या प्रकरणाचा तपशील.

नांव ..................................................................

[अर्जदाराने, जिल्हा, शल्यचिकित्सक किंवा प्राधिकृत वैदयकिय अधिकारी समक्ष लिहावे]

धारण केलेले पद.................................................

वय......................

एकूण सेवा....................

वैदयकिय प्रमाणपत्राच्या आधारे घेतलेल्या अनुपस्थिती रजेचे मागील कालावधी.....

तवधी......................

आजार.....................

श्री/श्रीमती/कुमारी..................................................................

यांची काळजीपूर्वक वैयक्तिक तपासणी केल्यानंतर मी,........................

जिल्हा शल्यचिकित्सक/वैदयकीय अधिकारी,................याद्वारे असे प्रमाणित करतो की, त्यांची प्रकृती अतिशय खालावलेली आहे आणि ग्राहय अनुमानानुसार त्यांची प्रकृती बरी होण्यासाठी त्यांनी कामावर अनुपस्थित राहणे नितांत आवश्यक आहे असे प्रांजळपणे नमूद करून, त्यांना दिनांक...........पासून...............ची रजा मंजूर करण्यात यावी अशी मी शिफारस करतो.

* माझ्या मते, या अधिका-याने वैदयकिय मंडळापुढे उपस्थित होणे आवश्यक आहे/नाही.

दिनांक ................ प्राधिकृत वैदयकिय अधिकारी.

टीप -१ :- सुरुवातीस शिफारस करण्यात आलेल्या रजेचा कालावधी किंवा नंतर शिफारस करण्यात येणा-या रजावाढीसह आधी शिफारस करण्यात आलेला रजेचा कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक नसेल त्या वेळी वैदयकीय अधिका-याने त्यांच्या मते शासकीय कर्मचा-याचे वैदयकीय मंडळापुढे उपस्थित राहणे आवश्यक आहे किंवा नाही ते न चुकता प्रमाणित केले पाहिजे

टीप- २:- शक्यतोवर याच नमुन्याचा वापर करण्यात यावा आणि ती शासकीय कर्मचा-यांची सही घेतल्यानंतर भरण्यात यावा. शासकीय कर्मचा-यांना एखादया विशिष्ट ठिकाणाहून किंवा विशिष्ट ठिकाणी जाण्याची गरज आहे किंवा एखादया विशिष्ट ठिकाणी जाण्यास तो असमर्थ आहे असे प्रकरण अधिका-यांस

—मागे पहा.

प्रमाणीत करता येणार नाही. जेव्हा अशा कारणांवरून प्रशासकीय अधिका-याकडे अर्ज केलेला असेल तेव्हा अर्जदार सेवा करण्यास पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यासाठी त्याला वैद्यकिय मंडळाकडे पाठवावे किंवा कसे याबद्दलचा निर्णय घेणा-या संबंधीत प्राधिका-यांची तशी स्पष्ट इच्छा असेल तरच केवळ अशी प्रमाणपत्रें देण्यात येतील.

टीप ३:- या प्रमाणपत्रात केलेली कोणतीही शिफारस शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय नसलेली कोणतीही रजा मागण्यासाठी पुरावा ठरू शकणारा नाही.

नालबंद/८६

७९९

[नमुना ४ ]

[नियम ७१ पहा]

रजेची किंवा रजावाढीची किंवा रजा परिवर्तीत करण्याची शिफारस करण्यांत आलेल्या अराजपत्रीत अधिका-यांकरिता वैदयकीय प्रमाणपत्र.

शासकीय कर्मचा-यांची सही

वर सही करणार श्री/श्रीमती/कुमारी

यांची वैयक्तिक तपासणी केल्यानंतर मी

असे प्रमाणीत करतो की, त्यांना                    हा आजार झाला आहे. आणि त्यांची प्रकृती पूर्ववत होण्याकरिता त्यांना..........पासून........ पर्यंत कामावर अनुपस्थित राहणे नितांत आवश्यक आहे, असे मला वाटते.

प्राधिकृत वैदयकिय अधिकारी
रुग्णालय दवाखाना किंवा इतर
नोंदणीकृत वैदयक व्यवसायी.

दिनांक:- ............

टीप :- १ आजाराचे स्वरुप व संभाव्य कालावधी नमूद करण्यात यावा.

टीप :- २ शक्यतोवर याच नमुन्याचा वापर करण्यात यावा आणि तो शासकिय कर्मचा-याची सही घेतल्यानंतर भरण्यात यावा. शासकीय कर्मचाल्या-ला एखादया विशिष्ट ठिकाणाहून किंवा विशिष्ट ठिकाणी जाण्याची गरज आहे किंवा एखादया विशिष्ट ठिकाणी तो जाण्यास असमर्थक आहे असे प्रमाणन अधिका-यांस प्रमाणित करता येणार नाही. जेव्हा अशा कारणावरुन प्रशासकीय प्राधिका-याकडे अर्ज करण्यात येईल तेव्हा, अर्जदार सेवा करण्यास पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यां-साठी त्याला जिल्हाशल्यचिकित्सकाकडे पाठवावे किंवा की याबद्दल निर्णय घेणा-या संबंधीत प्राधिका-याची स्पष्ट इच्छा असेल तरच केवळ अशी प्रमाणपत्रे दयावीत.

टीप :- ३ दुसरे वैदयकिय मत घेणे आवश्यक असल्यास रजा मंजूर करणा-या सक्षम प्राधिका-याने शक्य तितक्या लवकर जिल्हा शल्य चिकित्सकाच्या दर्जाहून कमी दर्जा असणा-या वैदयकिय अधिका-याकडून त्याची दुस-यांदा वैदयकिय तपासणी करुन घेण्याची व्यवस्था केली पाहिजे असा वैदयकीय अधिकारी शासकीय कर्मचा-यांच्या आजाराबद्दलची वस्तुस्थिती आणि शिफारस करण्यात आलेल्या रजेची आवश्यकता याबाबत आपले मत देईल आणि त्यासाठी शासकीय कर्मचा-याला स्वत:समोर किंवा स्वत: नामनिर्देशित केलेल्या वैदकीय अधिका-यासमोर उपस्थित राहण्यास सांगेल.

टीप :- ४ या प्रमाणपत्रात केलेली कोणतीही शिफारस, शासकीय कर्मचा-याला अनुज्ञेय नसलेली कोणतीही रजा मागण्यासाठी पुरावा ठरु शकणार नाही.